## पुष्प – ३ : विठ्ठलरूप

**मैंद आला पंढरीस**

१. विटेवर श्रीविठ्ठलदेव समचरण व समदृष्टी उभे आहेत : समता हे जीवनातील मुख्य मूल्य.

२. प्रेमाशिवाय समता व्यवहारात नांदणे अशक्य : प्रेमाचे वाटप करण्यासाठीच विटेवर देव उभे : त्यांच्या भेटीसाठी वारी करायची ती केवळ प्रेम मागण्यासाठीच.

३. प्रेम हेच श्रीविठ्ठलदेवांचे स्वरूप : शबरीची तसेच सुदामदेवाची कथा सांगणे.

**************************************************

**संतबोल**

- विटेवरी समचरण सुंदर। बाळ सुकुमार यशोदेचें।। (श्रीनामदेवराय)
- समचरणदृष्टि विटेवरी साजिरी। तेथें माझी हरी वृत्ति राहो।। (श्रीतुकोबाराय)
- प्रेमा वाटितो उदार। देतां नाहीं सानाथोर।। (श्रीतुकोबाराय)
- विठ्ठल जीवाचा जिव्हाळा। विठ्ठल कृपेचा कोंवळा।
  विठ्ठल प्रेमाचा पुतळा। लावियेलें चाळा विश्व विठ्ठलें।। (श्रीतुकोबाराय)
- तो हा विठोबा निधान। ज्याचें ब्रह्मादिकां ध्यान। पाउलें समान। विटेवरी शोभती।। (श्रीज्ञानोबाराय)
- ऐका महिमा आवडीचीं। बोरें खाय भिलटीचीं।। (श्रीतुकोबाराय)
- 'वि' म्हणजे विकासला 'ठ' म्हणजे ठसावला। म्हणोनि विठ्ठल बोला। टीकाप्रश्निक।। (श्रीशेख महंमदबाबा)

**मंजिरी – ३**

१. ‘विठ्ठल’तत्व आणि त्याचे व्यापकत्व. भोळ्या–भाबड्या अज्ञजनांना प्रेमाने जवळ करणारा देव

२. ‘वि’ : विकासला, ‘ठ’ : ठसावला : शेख महंमदबाबाकृत विठ्ठलनामाचे स्पष्टीकरण.

३. भक्ताला मस्तकी धरून श्रीविठ्ठलदेव विटेवर उभे.

४. शैव आणि वैष्णव ऐक्याचे दर्शन.

*************************************************

**संतबोल**

- विठ्ठल विस्तारला जनीं। सप्तही पाताळें भरूनी। विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं। विठ्ठल मुनिमानसीं।। (श्रीतुकोबाराय)
- रूप पहातां तरी डोळसु। सुंदर पाहतां गोपवेषु। महिमा वर्णितां महेशु। जेणें मस्तकीं वंदिला।। (श्रीज्ञानोबाराय)
- विष्णुसहित शिव आणिला पंढरीं। केलें भीमातीरीं पेखणें जेणें।। (श्रीनिवृत्तिनाथ)
- हरिहरां भेद। नाहीं करूं नये वाद।। (श्रीतुकोबाराय)
- शिवविष्णु दोघे एकचि अवतार। वेदांनी निर्धार हाचि केला।। (श्रीनामदेवराय)
- नामा म्हणे येथें दुजा नको भाव। विष्णु तोचि शिव शिव विष्णु।। (श्रीनामदेवराय)
- शिव ब्रह्मा विष्णु तिन्ही देव एक। जे निराकार सम्यक विठ्ठल माझा।। (श्रीसांवतामहाराज)